# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**
**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**


# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक २०/०८/२०१९

## पोलीस नक्षल चकमकीत नक्षल कॅम्प उध्द्वस्त

- **चकमकीत ४ ते ५ माओवादी जखमी असण्याची शक्यता**

उपविभाग हेडरी अंतर्गत येणाऱ्या पोलीस मदत केंद्र गट्टा (जां.) हद्दीतील येलदडमी जंगल परिसरात गडचिरोली पोलीस दलाच्या विशेष अभियान पथकातील (सी-६०) जवान नक्षलविरोधी अभियान राबवित होते. आज रोजी सकाळी ११.०० वा.चे सुमारास जंगलात कॅम्प लावुन कॅम्पचे सभोवताली माओवादयांनी पोलीसांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने पेरुन ठेवलेले दोन भुसूरुंगाचा स्फोट घडवुन आणला तसेच पोलीसांच्या दिशेने अंदाधुंद गोळीबार सुरु केला. यावर सी-६० जवानांनी शौर्यपुर्ण कामगिरी करत माओवादयांचे मनसुबे उधळुन लावत स्वसंरक्षणार्थ प्रत्युत्तरादाखल गोळीबार केला. पोलीसांचा वाढता दबाव पाहुन माओवादी घनदाट जंगलाचा फायदा घेत घटनास्थळावरुन पळुन गेले.

यानंतर सदर घटनास्थळ व जंगल परिसराची पाहणी केली असता घटनास्थळावर १ रायफल, क्लेमोर, वायर तसेच मोठया प्रमाणावर भुसूरुंग स्फोट घडवुन आणण्याचे साहित्य, पिट्ठु व माओवादयांचे दैनंदिन वापराचे साहित्य मिळून आले. या चकमकीत चार ते पाच माओवादी जखमी झाले असल्याची शक्यता असुन सदर जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.

सी-६० जवानांच्या शौर्यपुर्ण कामगिरीचे मा. पोलीस अधीक्षक गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी कौतुक केले आहे.